

कशी पार करायची नदी?


एकदा एका माणसाला एक लांडगा, एक बकरी आणि एका कोबीच्या गडड्याला घेऊन नदी पार करायची होती.

पण त्याची होडी इतकी छोटी होती, की एका वेळी सोबत तो काहीतरी एकच नेऊ शकत होता. एकेक करून लांडगा, बकरी आणि कोबीला कसं बरं न्यावं, म्हणजे लांडगा बकरीला खाणार नाही, अणि बकरी कोबी खाऊन टाकणार नाही, ह्या विचारात माणूस पडला.

तुम्ही त्याची मदत करू शकता का?









कसं बरं हे जमवलं त्याने?

एक उत्तर:



तो पहिल्यांदा बकरीला घेऊन गेला.




आणि परत आला.




मग लांडग्याला घेऊन गेला.




येताना बकरीला परत घेऊन आला.



बकरीला किनाऱ्यावर सोडून कोबी घेऊन गेला.




आणि शेवटी




तो बकरीला लांडगा आणि
कोबीपाशी परत घेऊन गेला.


दुसरं उत्तर:



तो पहिल्यांदा बकरीला घेऊन गेला.




आणि एकटाच परात आला.




मग कोबी घेऊन गेला.




येताना बकरीला परत घेऊन आला.



बकरीला किनाऱ्यावर सोडून लांडग्याला घेऊन गेला.



आणि एकटा परत आला.



आणि शेवटी बकरीला घेऊन गेला.